दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अनुप फंड (कार्यकारी संपादक),
निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)








मुंबई || वर्ष ६ वे || अंक ११२ || रविवार, १९ एप्रिल २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||


## राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची : इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकवणे अनिवार्य; नियम मोडणा-या शाळांवर दंडाची तरतूद

मुंबई : प्रतिनिधी

मराठी भाषेबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या सर्व माध्यम आणि मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली जाणार आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषेचे अध्यापन आणि अध्ययनाची सक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या नियमाचे उल्लंघन करणा-या शाळांवर कारवाई देखील केली जाणार आहे.

नियम मोडणा-या शाळांवर १ लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे. तर वारंवार आदेश धुडकावणा-या शाळांची मान्यता रद्द करण्याची तरतूद नवीन शासन निर्णयात करण्यात आली आहे.




राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा सक्तीची असतानाही नियमांचे पालन न करणा-या शाळांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने सविस्तर कार्यपद्धती निश्चित केली असून याबाबतचा शासननिर्णय जारी करण्यात आला आहे.

अनेक खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये अद्यापही मराठी विषय शिकविला जात नाही, ही बाब निदर्शनास आल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने शुक्रवारी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. दरम्यान मराठी सक्तीच्या अंमलबजावणीसाठी विभागीय शिक्षण उपसंचालकांना 'सक्षम प्राधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र भाषेचे अध्यापन व अध्ययन अधिनियम, २०२० नुसार राज्यात १ एप्रिल २०२० पासून मराठी सक्तीची करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार सर्व शाळांनी मराठी विषय शिकवण्यासाठी केवळ मराठी विषयातील विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकांची नियुक्ती करणे अनिवार्य आहे. शाळा सुरू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत शिक्षण उपसंचालक किंवा शिक्षणाधिका-यांच्या पथकाकडून शाळांची तपासणी केली जाईल.

या पथकात अनुभवी मराठी शिक्षकांचा समावेश असणार आहे. नियमांचे उल्लंघन करणा-या शाळांना नोटीस बजावण्यात येईल. नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत शाळेला आपला खुलासा सादर करावा लागेल. विभागीय शिक्षण उपसंचालकांनी शाळेचा खुलासा समाधानकारक नसल्याचे आढळले तर अधिनियमातील कलम १२(१) नुसार संबंधित शाळेला १ लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाईल.

दंडाची रक्कम भरल्यानंतरही किंवा शिक्षण संचालकांच्या आदेशानंतरही संबंधित शाळेने मराठी विषयाचे अध्यापन सुरू केले नसेल तर अशा शाळांचा सविस्तर अहवाल शिक्षण आयुक्तांकडे पाठवला जाईल. शिक्षण आयुक्त या प्रकरणाची सुनावणी घेऊन संबंधित शाळेची मान्यता पुढील शैक्षणिक वर्षापासून रद्द करण्याचे आदेश काढले जाऊ शकतील.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सोलापुरात आज भव्य मिरवणुका ; १८०० पोलिसांचा तगडा बंदोबस्त

सोलापूर :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रति वर्षाप्रमाणे आज रविवार रोजी सोलापूर शहरात प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा - मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सोलापूर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने कडक आणि व्यापक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



पोलीस बंदोबस्तात वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते जवानांपर्यंत मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. यामध्ये ३ पोलीस उपआयुक्त, ७ सहाय्यक पोलीस आयुक्त, २४ पोलीस निरीक्षक, ६१ सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक, ९९५ पोलीस अंमलदार, ६०० होमगार्ड तसेच एसआरपीएफची १ कंपनी असा एकूण १८०० पोलिसांचा तगडा बंदोबस्त नेमण्यात आला आहे. मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, तसेच वाहतूक सुरळीत राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने पूर्वतयारी बैठक घेतली असून सर्व अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील संवेदनशील भाग, प्रमुख मार्ग आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

## यशकथा : बँक सखी ते लखपती दीदींची आधारस्तंभ: कावेरी जाधव यांचा प्रेरणादायी प्रवास

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बँक सखी हे पद केवळ एक नोकरी नसून ती एक क्रांती ठरू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कावेरी भाऊसाहेब जाधव. २०१८ पासून बँक ऑफ महाराष्ट्राच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुका, वेरूळ आणि परिसरातील गावांमध्ये त्यांनी आपल्या कार्याचा जो ठसा उमटवला आहे, तो आज हजारो महिलांसाठी दिशादर्शक ठरत आहे. बचत गटातून सक्षमीकरणाकडे

कावेरी जाधव यांचा प्रवास एका सामान्य बचत गटापासून सुरू झाला. चिंतामणी बचत गट आणि संजीवनी स्वयं सहायता समूह पासून. त्यांची जिद्द आणि कामाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी स्वतःला केवळ एका गटापुरते मर्यादित न ठेवता विविध ग्रामसंघ आणि समूहांना जोडण्याचे काम केले. शासनाच्या विविध योजना आणि बँकिंग व्यवहारांमधील दुवा म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावी भूमिका बजावली आहे.




**छोटी बँक म्हणून ओळख**

ग्रामीण भागात बँकेचे व्यवहार करणे, कर्ज मिळवणे किंवा कागदपत्रांची पूर्तता करणे हे आजही आव्हानात्मक मानले जाते. कावेरी यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यांनी महिलांना मोलाची मदत केली.यात

बँकिंग सेवा,नवीन खाते उघडणे, पॅन आणि केवायसी अपडेट करणे, मोबाईल लिंकिंग आणि विमा योजनांचे लाभ मिळवून देणे आणि विमा पॉलिसीच्या पावत्या यांसारख्या किचकट कागदपत्रांची पूर्तता करण्यात त्यांनी महिलांना सुलभता निर्माण करून दिली.

खुलताबाद तालुक्यातील तलाववाडी, आखातवाडा, पिंपरी, पळसवाडी, चिंचोली आणि सांदलवाडी यांसारख्या दुर्गम भागातील महिलांपर्यंत पोहोचून त्यांनी आर्थिक साक्षरता पसरवली.लखपती दीदींचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी कावेरी जाधव यांनी आतापर्यंत १५६ बचत गटांतील सुमारे १५०० महिलांना मार्गदर्शन केले आहे. विशेष म्हणजे, त्यांनी ४० ते ४५ विविध उद्योगांसाठी १कोटी ५२ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात यश मिळवले आहे त्यांच्या मार्गदर्शनामुळे आज अनेक महिला लखपती दीदी झाल्या असून, त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत एकही बँक खाते (थकीत कर्ज) झाले नाही, हे त्यांच्या कामाचे आणि महिलांच्या प्रामाणिकपणाचे मोठे यश आहे.

**बँक कामकाजासह सामाजिक बांधिलकी**

बँकिंग कामाव्यतिरिक्त कावेरी जाधव यांनी शासनाच्या विविध सामाजिक योजनांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

आयुष्मान भारत, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, स्वच्छता अभियानाचा प्रसार. मतदार यादी सर्वेक्षण आणि जनगणनेसारख्या महत्त्वाच्या कामांमध्ये त्याचा सहभाग आहे.

आरसेटी च्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय, हॉटेल, फळ विक्री, ज्यूट बॅग निर्मिती , पापड लोणचे उत्पादन आणि कापड व्यवसाय यांसारख्या उद्योगांसाठी महिलांना प्रशिक्षण व स्टॉल मिळवून देण्यासाठी समन्वयक यांची भूमिका बजावली आहे.**आर्थिक स्वावलंबन आणि सन्मान**

आज कावेरी जाधव आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून दरमहा १५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. गावकऱ्यांनी त्यांना दिलेली छोटी बँकही पदवी त्यांच्यावरील विश्वासाचे प्रतीक आहे. बँकसखी बरोबरच ग्रामीण महिलांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणणारी लक्ष्मी म्हणून त्या ओळखल्या जात आहेत.कावेरी जाधव यांनी आपल्या कष्टाने केवळ स्वतःची ओळख निर्माण केली नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवून एक नवा विश्वासबंध निर्माण केला आहे. ग्रामीण भागातील बँकांची सेवा ही विश्वासाच्या नात्यावर अवलंबून असते. त्याचबरोबर त्या विश्वासास पात्र ठरत महिलाना एक सखी, मैत्रीण म्हणून दिलेला हात तो आर्थिक सक्षमीकरणाचा पाया मजबूत करणारा ठरला आहे.

**डॉ. मीरा ढास,माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढला : केंद्र सरकारचा मोठा निर्णय!

नवी दिल्ली : केंद्रीय मंत्रिमंडळाने आज (दि. १८) केंद्र सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यात २ टक्क्यांनी वाढ करण्यास



मंजुरी दिली. प्रस्तावित ८ व्या वेतन आयोगांतर्गत वेतन रचनेत मोठे बदल करण्याच्या कर्मचारी संघटनांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.नॅशनल कॉन्सिल-जॉईंट कन्सल्टेटिव्ह मशिनरीने सरकारला सादर केलेल्या निवेदनात वेतन रचनेत मोठे बदल करण्याची मागणी केली आहे. यात प्रामुख्याने ३.८३ इतक्या उच्च 'फिटमेंट फॅक्टर'ची मागणी आहे; ज्यामुळे किमान मूळ वेतन १८,००० रुपयांवरून वाढून सुमारे ६९,००० रुपयांपर्यंत पोहोचू शकेल.

वेतन गणनेसाठी 'कुटुंब' या संज्ञेची व्याप्ती वाढवून त्यात अवलंबून असलेल्या पालकांचा समावेश करण्याचा प्रस्तावही या संघटनेने मांडला आहे. तसेच, वेतनातील तफावतीवर मर्यादा घालण्याची, आणि त्यासोबतच उच्च वेतनवाढ व महागाईशी निगडित भत्ते देण्याची शिफारस केली आहे.सागरी क्षेत्रासाठी १३ हजार कोटींचा निधी

याच बैठकीत केंद्र सरकारने भारतीय जहाजांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भारतीय ध्वजधारक आणि भारताकडे येणा-या-जाणा-या जहाजांना स्वस्त दरात विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी १३,००० कोटी रुपयांचा 'सॉवरेन मेरीटाईम फंड' स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे सागरी व्यापारात भारतीय जहाजांना अधिक स्थैर्य प्राप्त होईल.

## महाराष्ट्रात उष्णतेचा इशारा; विदर्भात तापमान ४४ अंश पार

मुंबई : राज्यात सध्या तापमान खूप जास्त वाढताना दिसत आहे. घराबाहेर पडल्यावर घामाच्या धारा लागतात. दरम्यान, महाराष्ट्रात सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भात झाली आहे. विदर्भात तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी कडक उन्हात बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. तसेच अनेक जिल्ह्यांमध्ये



शाळा-कॉलेजला सुटी देण्यात आली आहे.

विदर्भात तापमानाचा पारा वाढतच आहे. वाढते तापमान आणि उष्ण लाटेच्या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आज नागपुरात शाळा-कॉलेजला सुटी असणार आहे. विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास होऊ नये यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

अमरावतीत सर्वाधिक ४४.४ अंश तापमान

विदर्भात सर्वांत जास्त तापमान आहे. अमरावतीत तर ४४.४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये तापमान ४४ अंश सेल्सियसपेक्षाही जास्त आहे. अकोला हा तर जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या जिल्ह्यांमध्ये दुस-या क्रमांकावर होता. दरम्यान, काल अकोल्याच्या तापमानात किंचित घट झाली होती. मात्र, अमरावती, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, वाशिम आणि गडचिरोलीच्या तापमानात वाढ झाली आहे.

संपादकीय

## महाराष्ट्र तापला!

राज्यावर सध्या सूर्याचा प्रकोप झालेला दिसतो. संपूर्ण महाराष्ट्र उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार विदर्भासह राज्याच्या अनेक भागात उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये उकाडा अस झाला आहे. ही परिस्थिती पाहून प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. विदर्भात उन्हाचा चटका सर्वाधिक जाणवत असून अकोला येथे यंदाच्या हंगामातील उच्चांकी ४३.१अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे सोमवारी नोंदवण्यात आलेले देशातील सर्वाधिक तापमान ठरले. अकोला पाठोपाठ विदर्भातील इतर शहरांमध्येही पारा चढलेलाच आहे. अमरावती आणि वर्धामध्ये ४२ अंश सेल्सिअस तर चंद्रपूर, नागपूर, वाशिम आणि गडचिरोलीमध्ये ४१ अंशापेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. याशिवाय उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, जळगाव, धुळे, सोलापूर, परभणी येथेही तापमान ४१ अंशाच्या पुढे गेले आहे. ठाणे आणि राजगड जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

१५ एप्रिलपासून विदर्भासह राज्याच्या इतर भागात उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत. बिहारपासून तामिळनाडूपर्यंत विस्तारलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हवामानात हे बदल होत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे होणारे आजार आणि मृत्यू रोखण्यासाठी राज्य सरकारने तीन व्यापक मानक कार्यपद्धती लागू केल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, विशेषत: उघड्यावर काम करणारे मजूर आणि खाण कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. उष्णतेचा सर्वाधिक धोका असलेल्या जिल्ह्यांमध्ये लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड यांचा समावेश आहे. चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगारांसाठी आणि कमी उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व्यवस्था करण्यावर सरकार भर देत आहे. दुपारच्या वेळी तापमान ४० अंशाच्या पार जात असल्याने शक्यतो घराबाहेर पडणे टाळणे, सतत पाणी पिणे आणि कडक उन्हापासून स्वत:चा बचाव करणे आवश्यक आहे. विदर्भातील तापमानाने जागतिक विक्रम मोडण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार जगातील १० सर्वांत उष्ण शहरांच्या यादीत विदर्भातील तब्बल ४ शहरांचा समावेश आहे. यात अकोला हे जगातील दुसरे सर्वांत उष्ण शहर ठरले आहे.

अकोल्यात तापमानाचा पारा ४३ अंशाच्या पुढे गेला आहे. टॉप १० मध्ये चंद्रपूर, ब्रह्मपुरी आणि वर्धा या शहरांचाही समावेश आहे. या शहरांमधील तापमान सातत्याने ४२ ते ४५ अंशादरम्यान राहत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते जर उष्णतेची हीच लाट कायम राहिली तर मे महिन्यात पारा ५० अंश सेल्सिअस ओलांडण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यात बहुतांश ठिकाणी अंगाची लाही-लाही होत असून उन्हाचा पारा चांगलाच चढला आहे. कमाल तापमान चाळीशी पार गेले आहे. सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा धोका असून हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबईसह राज्यातील ८ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान कोरडे, उष्ण आणि काही भागात दमट राहण्याचा अंदाज आहे. वाढत्या उन्हामुळे उष्माघात होण्याच्या संख्येत वाढ होत आहे. उष्माघाताच्या घटना रोखण्यासाठी राज्य सरकारकडून ऑरेंज आणि रेड अलर्ट देण्यात आले आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशात उष्णतेची तीव्रता सर्वाधिक आहे.

# भाकरीवाले पाटील महिला स्वयंसहाय्यता समूहाची यशस्वी वाटचाल

प्रमिला जोशी (अलिबाग प्रतिनिधी)

ग्रामीण महिलांच्या जिद्दी, एकजुटी आणि कष्टातून उभी राहिलेली यशाची प्रेरणादायी कहाणी म्हणजे भाकरीवाले पाटील महिला स्वयंसहाय्यता समूह. अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील या समूहाने घरगुती व्यवसायातून सुरुवात करत आज यशस्वी हॉटेल व्यवसाय उभारून एक आदर्श निर्माण केला आहे.ङ्गसन १९ ऑक्टोबर २०१८ रोजी स्थापन झालेल्या या समूहाच्या उद्योजिका सौ. वैभवी चंद्रकांत राऊळ यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी आपल्या कष्टाच्या जोरावर व्यवसायाला नवी दिशा दिली. सुरुवातीला अलिबाग परिसरातील पर्यटन क्षेत्र लक्षात घेऊन हॉटेलांना भाकरी पुरवण्याचा व्यवसाय सुरू करण्यात आला. मागील अनेक वर्षांपासून महिलांकडून चालत आलेल्या या पारंपरिक व्यवसायाला त्यांनी संघटित रूप दिले.ङ्गअलिबाग, नागाव, काशीद, मुरुड या पर्यटन स्थळांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असल्याने हॉटेल व्यवसायाला चांगली मागणी होती. या संधीचा लाभ घेत महिलांनी भाकरी पुरवठा व्यवसाय विस्तारला. त्यानंतर त्यांनी घरगुती होमस्टे सुरू केला, ज्याला ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. अस्सल घरगुती चव आणि महिलांच्या हातची खासियत यामुळे ग्राहकांची पसंती मिळत





गेली.ङ्गया यशाच्या जोरावर जानेवारी २०२३ मध्ये सहान बायपास रोड, अलिबाग येथे ''भाकरीवाले पाटील लंच होम'' या नावाने पहिली शाखा सुरू करण्यात आली. अल्पावधीतच या हॉटेलला मोठा प्रतिसाद मिळाला. वाढत्या मागणीमुळे १५ ऑगस्ट २०२३ रोजी अलिबाग शहरात कलेक्टर कार्यालयासमोर हिराकोट तलावाजवळ दुसरी शाखा सुरू करण्यात आली.ङ्गउमेद अभियानात सहभागी झाल्यानंतर समूहाच्या कार्याला अधिक बळ मिळाले. महिलांनी एकत्र येऊन मोठ्या बाजारपेठेत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आणि व्यवसायातही विस्तार झाला. तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील उमेद अभियान व्यवस्थापन कक्षाकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे समूहाने राज्य व देश पातळीवर आपली ओळख निर्माण केली.ङ्गसमूहाला महालक्ष्मी सरस २०२३-२४ मध्ये देशभरातील समूहांमध्ये सर्वाधिक विक्री केल्याबद्दल गौरविण्यात आले, तसेच ''सावित्री रत्न पुरस्कार २०२४'' नेही सन्मानित करण्यात आले आहे.ङ्गआर्थिक बळकटीसाठी समूहाने सुरुवातीला बँक ऑफ इंडिया, अलिबाग शाखेकडून ३ लाख रुपयांचे कर्ज घेतले व त्याची वेळेत परतफेड केली. त्यानंतर त्यांना ६ लाख रुपयांचे अर्थसहाय्य प्राप्त झाले. बँकेकडून तसेच लीड डिस्ट्रिक्ट मॅनेजर विजयकुमार कुलकर्णी यांचे मार्गदर्शनही लाभले.ङ्गउमेद अभियानांतर्गत फिरता निधी, समूह कर्ज व ग्रामसंघामार्फत विविध आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे व्यवसाय वृद्धीस चालना मिळाली. बँकिंग प्रणालीच्या मदतीने महिलांनी स्वत:चा व्यवसाय अधिक सक्षम केला.ङ्गआज या समूहाच्या यशामुळे महाराष्ट्रातील विविध भागांतून शाखा सुरू करण्यासाठी प्रस्ताव येत असून, अनेक महिला उद्योजकांनी त्यांच्या व्यवसाय मॉडेलमध्ये रस दाखवला आहे. भविष्यात महाराष्ट्रासह देशभर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपल्या अस्सल चवीचा विस्तार करण्याचा त्यांचा मानस आहे.



जिजाऊ संस्थेचे प्रमुख शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांना शिवसेना उपनेते माजी आ. राजन साळवी यांनी भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी पदाधिकारी उपस्थित होते

## माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत तालुका आरोग्य विभाग पंचायत समिती दापोली येथे कार्यशाळा सभा संपन्न

दापोली प्रतिनिधी,:- विशेष अभियानांतर्गत पंचायत समिती सभापती श्री. उन्मेष राजे यांच्या अध्यक्षतेखाली माझं गाव आरोग्य संपन्न गाव कार्यशाळा पार पडली.यावेळी पंचायत समिती सभापती श्री. उन्मेष राजे,

उपसभापती श्रीम.नम्रता तोडणकर,जि.प. सदस्य श्रीम. साधना महाजन, श्री. प्रभाकर गोलांबडे तसेच पं.स. सदस्य श्री. श्रीराम ईदाते व श्री. संदीप चिखले उपस्थित होते. ङ्गया कार्यशाळेमध्ये सदर अभियानात राबवण्यात येणाऱ्या सर्व महत्त्वाच्या आरोग्य कार्यक्रमांबाबत सविस्तर माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अमित वंजारे यांनी दिली. उपस्थित कर्मचाऱ्यांना शासकीय योजना, लसीकरण मोहीम, स्वच्छता आणि विविध आजारांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत तसेच अभियानांतर्गत प्रत्येक स्तरावर असणाऱ्या पुरस्कार बाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर विशेष भर दिला.

तसेच मा. सभापती श्री. राजे यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवून जास्तीत जास्त पुरस्कार मिळण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले त्याबरोबरच आरोग्य विभागाला भरघोस निधी देण्याचे आश्वासन दिले. आरोग्य समिती सदस्य श्रीम. महाजन यांनी आरोग्य विभागाला आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या उपकरणे जिल्हा स्तरावरून उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच सदर अभियानामध्ये सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट काम करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## घरडा अभियांत्रिकी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी

मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्त महाविद्यालयाच्या मध्यवर्ती



ग्रंथालयात मा. प्राचार्य प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य सचिन पाटील व महाविद्यालयाचे रजिस्ट्रार संदीप मुनघाटे सर यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी सार्थक सुनिल जाधव यांने बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती विषयी अतिशय बोलक्या शब्दामध्ये व ओघवत्या शैलीत जयंती केवळ साजरी करु नका तर त्यांनी दिलेल्या शिकवणीला आत्मसात करुन ती प्रत्यक्ष आचरणात आणा असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार अविष्कार देसाई याने केले . या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# मौजे वनौशी येथे मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण उत्साहात संपन्न

दापोली प्रतिनिधी: दापोली तालुक्यातील मौजे वनौशी येथे मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रिया या विषयावर एक दिवसीय तालुकास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत



उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली व कृषी महाविद्यालय, दापोलीच्या कृषी विस्तार शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.ङ्गकार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सहयोगी अधिष्ठाता डॉ. राकेश गजभिये उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी उपसरपंच श्री. प्रकाश तेरेकर होते. यावेळी डॉ. नितेश दळवी, डॉ. किरण शिगवण, डॉ. प्रवीण झगडे यांसह स्थानिक मान्यवर व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. नितेश दळवी यांनी प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला.ङ्गप्रशिक्षणादरम्यान दालचिनी, काळी मिरी, हळद, आले, जायफळ, कोकम आदी मसाला पिकांच्या लागवड तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कोकणातील आंबा, नारळ, काजू व फणस यांसारख्या पिकांच्या व्यावसायिक लागवडीवरही भर देण्यात आला. काढणीनंतरची प्रक्रिया व कलम बांधणीचे प्रात्यक्षिक माळी संदीप कांगणे यांनी सादर केले.ङ्गकार्यक्रमाच्या निमित्ताने विविध मसाला पिकांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. सहभागी शेतकऱ्यांनी प्रशिक्षणातून उपयुक्त माहिती मिळाल्याचे सांगत समाधान व्यक्त केले.ङ्गकार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण झगडे यांनी केले. एकूण ११८ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व काळी मिरीची रोपे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक ग्रामस्थ व विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पोफळी प्राथमिक शाळेचे स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित प्राथमिक शाळा पोफळी येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सांगली शिक्षण संस्थेच्या गुणवत्ता शोध परीक्षा(. . .), शताब्दी व वेलफेअर फाऊंडेश अहिल्यानगरच्या मंथन शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण १५ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.



प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षिका सौ.शिवानी शिंदे, सौ.प्रतिभा धुमाळ, श्री.अशोक मिसाळ,सौ.साधना गायकवाड, सौ.रिता मलमे यांनी या स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेकडून तसेच पोफळी पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे..

परीक्षा

राज्य सर्वसाधारण गुणवत्ता ग्रामीण यादीतील बक्षीस पात्र ०९ विद्यार्थी

इयत्ता दुसरी

१)कु. माही पवार

(१५० पैकी १२६ प्राप्त गुण रँक ८ वी )

२) कु.मनस्वी कुचेकर

(१५० पैकी १२६ प्राप्त गुण रँक ८ वी )

३)कु.अवनी शेलार (१५० पैकी १२० प्राप्त गुण रँक ११ वी ) इयत्ता तिसरी १)कु.अमोघ जोशी (३०० पैकी २६६ प्राप्त गुण रँक ७ वी )

२) कु. अंशुल पवार (३०० पैकी २५८ प्राप्त गुण रँक ११ वी ) ३) कु.विघ्नेश देसाई (३०० पैकी २५४ प्राप्त गुण रँक १३ वी ) ४) कु. मानस देशमुख (३०० पैकी २४८ प्राप्त गुण रँक १६ वी ) ५) कु.अद्विका भुजबळ (३०० पैकी २४८ प्राप्त गुण रँक १६ वी ) ६) कु.मानसी साळुंखे (३०० पैकी २४८ प्राप्त गुण रँक १७ वी ) केंद्र गुणवत्ता यादीतील बक्षीस पात्र ०३ विद्यार्थी

इयत्ता :- पहिली १५० पैकी प्राप्त गुण

*१) कु.श्रावणी सुळ

११८ गुण केंद्रात प्रथम

इयत्ता दुसरी

*१५० पैकी प्राप्त गुण

२) कु.तुबा शेख ११८ गुण केंद्रात प्रथम

इयत्ता तिसरी

३०० पैकी प्राप्त गुण

३) कु.मनस्वी राडचे २४० गुण केंद्रात प्रथम

इयत्ता:-चौथी

३०० पैकी प्राप्त गुण

४) कु.पियूष गुळवे २५८ गुण केंद्रात प्रथम

मंथन शिष्यवृत्ती परीक्षा

इयत्ता :- तिसरी

१) कु. अद्विक मयूर पवार.

(३०० पैकी २६६ प्राप्त गुण)

राज्य रँक १९ वी व तालुका रँक

इयत्ता :- सातवी

२) कु. प्रतिक गुळवे इयत्ता ७ वी

३०० पैकी २१८ गुण

राज्य रँक ३७ वी

प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा व उपक्रम नेहमीच घेतले जातात. यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते.

# उमरोली अरमरे वाडी येथे २१ पासून श्री साई सेवा मंदिर जीर्णोद्धार सोहळ्यास प्रारंभ चार दिवस चालणार साई नामाचा गजर

चिपळूण : तालुक्यातील श्री साई सेवा मंडळ उमरोली अरमरेवाडी यांच्या वतीने मंगळवार दिनांक २१ ते २४ एप्रिल दरम्यान श्री साई मंदिर जीर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.ङ्गङ्गश्री साई सेवा मंडळाच्या वतीने मंगळवार २१ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता श्रींच्या मूर्तीचे भव्य मिरवणूक होणार आहे. त्यानंतर रात्री १० वाजता महाप्रसाद होईल. ङ्गबुधवार २२ रोजी सकाळी ८ वाजता वास्तु प्रवेश व वास्तुशांती, सकाळी ११.३० वाजता देवता प्रवेश, सकाळी ११.३० ते १२ वाजता जलाधीवास, दुपारी १२ ते १२.३० वाजता धान्यधीवास, दुपारी १२.३० वाजता निद्राधीवास, दुपारी १ ते २ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ४ वाजता साई सेवा भजन मंडळ मुंबई यांचा कार्यक्रम, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ७.३० ते ९.३० ह भ प अनंत मोरे यांचे कीर्तन आणि रात्री १.३० वाजता श्री भैरी भवानी भारुड मंडळ यांचा बहुरंगी कार्यक्रम होईल.ङ्गङ्गत्यानंतर गुरुवार दिनांक २३ रोजी सकाळी ८.३० ते ११.३० वाजता होम हवन, दुपारी १२ वाजता श्रींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना, दुपारी १२.३० वाजता कलशारोहण,


दुपारी १ ते २ महाप्रसाद, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, रात्री ७.३० ते ९.३० वाजता ह भ प नारायण पवार अनारी यांचे कीर्तन, रात्री १०.३० वाजता श्री साई सेवा महिला मंडळ संकल्पित गर्जा महाराष्ट्र माझा हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. ङ्गङ्गमंडळाच्या वतीने शुक्रवार २४ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजता काकड आरती, सकाळी १० वाजता शैक्षणिक ,सांस्कृतिक, क्रीडा कार्यक्रम, सकाळी ११ ते १ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा, दुपारी १ ते २ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ७.३० ते ९ वाजता श्री साई सेवा भजन मंडळ वेळवंड रत्नागिरी यांचा कार्यक्रम होईल. रात्री ९ ते १० वाजता महाप्रसाद, रात्री १० वाजता स्वागत समारंभ आणि रात्री १०.३० वाजता श्री रवळनाथ रिमिक्स नमन मंडळ रत्नागिरी लयभारी यांचा बहुरंगी कार्यक्रम होईल. साई सेवा मंडळ उमरोली अरमरेवाडी यांच्या वतीने चार दिवसाचा हा साई सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी साई भक्तांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

जीवामृत शेतजमिनीसाठी संजीवनी

राज्यातील शेतकरी हा अवकाळी पाऊस आणि ओल्या तसेच कोरड्या दुष्काळामुळे अगोदरच त्रस्त आहे. त्यातून उभ्या पिकांची



हानी आणि दुबार पेरणीच्या साठी सावकारी कर्ज आणि हे कर्ज न फेडता आल्यामुळे आत्महत्या हे सत्र सुरु आहे. परंतु त्याच वेळी शेतातील मातीमध्ये अनेक रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनी देखील नापीक होताना दिसताहेत. ज्यामुळे अशा जमिनी शेतीसाठी उपयुक्त राहत नाहीत. म्हणूनच,रासायनिक खतांचा वापर कमी करून नापीक जमिनींना सुपीक बनविणारी संजीवनी अर्थात जीवामृत खतांचा पर्याय सरकारने तपासला आहे. याच अनुषंगाने राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१नापीक जमिनीसाठी राज्यसरकारने जीवामृत खतांचा पर्याय आणला आहे त्याबद्दल?

शेतकऱ्यांचे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय शेतीला बळ देणारे जीवामृत हे खत राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विकास मंडळाकडून निर्माण करण्यात आले आहे. पुणे येथील शासकीय पशुपैदास केंद्र तायवडे येथे या जीवामृताची चाचणी करण्यात आली. या चाचणीत नापीक जमिनीचा पोत कमालीचं वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविले गेले. जीवामृत खताचा वापर करून मका हे सकस पीक घेण्यात आले असून पुढील काळात आणखी क्षेत्रावर त्याचा वापर करून हे खत शेतकऱ्यांना माफक दारात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




२तायवडे येथील शेतजमिनीवर राबविलेल्या जीवामृताच्या प्रयोगाचे फलित नेमके काय होते?

पुण्यातील तायवाडे येथे मक्याचे उत्पादन घेण्यात आले असून संतुलित वापरामुळे जोमदार पीक मिळाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. तायवाडे येथे राबविण्यात आलेला पथदर्शी प्रकल्प पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल आहेर आणि कृषी सहायक राजवर्धन घोगरे यांचं नेतृत्वात पार पडला. या प्रकल्पात जीवामृताच्या वापरामुळे जमिनीतील सूक्ष्म जिवाणूंची संख्या अवधून पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढल्याचे निर्दशनास आले. हे खत जमिनीची सुपीकता वाढवून जमीन विषमुक्त करण्यास मदत करणारे आहे .

३ या जीवामृत खताचे वितरण शेतकऱ्यांपर्यंत कसे केले जाणार आहे?

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाकडून या जीवामृत खताची निमिर्ती करण्यात अली असून गाईचे शेण,गोमूत्र,गूळ ,बेसन आणि शेतातील माती यापासून निर्माण करण्यात आलेलं आहे. शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय उपलब्ध झाला असून कृषी निविष्ठा आणि औषधांचा खर्च देखील यामुळे कमी होणार आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन जीवामृताची दर निश्चिती करून ते शेतकऱ्यांसाठी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

२ नोंद

उद्योग विकासातील योगदानाच्या सन्मानार्थ पोष्टाचे विशेष टपाल कव्हर

एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने देशातील व्यापार आणि उद्योग विकासातील योगदानाच्या सन्मानार्थ इंडिया पोस्टतर्फे विशेष टपाल कव्हर प्राप्त केले आहे. भारताच्या जागतिक व्यापार प्रवासातील आपल्या पाच दशकांहून अधिक काळाच्या भूमिकेचा उत्सव साजरा करत, डब्ल्यूटीसी मुंबईने ही उपलब्धी साजरी करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गेल्या अनेक दशकांपासून, या संस्थेने भारतीय व्यवसायांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यात, व्यापाराला चालना देण्यात आणि आर्थिक भागीदारी वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष, डॉ. विजय कलंत्री म्हणाले, ''आम्हाला डब्ल्यूटीसी मुंबईच्या प्रवासावर चिंतन करताना प्रचंड अभिमान वाटतो. या केंद्राची स्थापना भारतरत्न एम. विश्वेश्वरैया यांच्या दूरदर्शी आदर्शांवर झाली, ज्यांचा नियोजन, नावीन्य आणि उद्यमशीलतेद्वारे राष्ट्र उभारणीवर विश्वास होता. भारताची व्यापारी राजधानी असलेल्या मुंबईला व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राचे जागतिक केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या दूरदृष्टीने डब्ल्यूटीसी मुंबईची स्थापना करण्यात आली.''

प्रमुख भाषणात, महाराष्ट्र मंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल श्री. अमिताभ सिंह यांनी भारताची व्यापार परिसंस्था मजबूत करण्यात डब्ल्यूटीसी मुंबईने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची दखल घेतली. ते म्हणाले, ''डब्ल्यूटीसी मुंबईसारख्या संस्था व्यावसायिक देवाणघेवाणीसाठी अर्थपूर्ण व्यासपीठ तयार करतात, जे व्यापार आणि समृद्धीला चालना देण्यासाठी अपरिहार्य आहेत.''

३ चला पर्यटनाला

कोल्हापुरातील रामतीर्थ धबधबा

कोल्हापूर हे प्राचीन संस्थानांपैकी एक आहे ज्यात मराठा काळातील समृद्ध वारसा आहे. कोल्हापूर हे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे तसेच हस्तकलेसाठी, विशेषतः कोल्हापुरी चप्पलसाठी ओळखले जाणारे शहर आहे. दरवर्षी हजारो भारतीय आणि विदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. कोल्हापूरच्या आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीच्या काठी उतरलेला, रामतीर्थ धबधबा हा त्याच्या अतुलनीय शांततेसाठी आणि सौंदर्यासाठी लोकप्रिय असलेला नैसर्गिक धबधबा आहे. कोल्हापूरच्या मुख्य पर्यटन स्थळामध्ये समाविष्ट असलेल्या या ठिकाणाचा वापर बहुतांशी सहलीसाठी आणि शहराच्या गजबजाटापासून दूर एकांतात वेळ घालवण्यासाठी केला जातो. तुम्हालाही तुमच्या दैनंदिन व्यस्त जीवनापासून आणि शहरातील गर्दीपासून दूर राहून तुमच्या कुटुंबासह, मित्रांसोबत किंवा प्रियकरासह एकांतात वेळ घालवायचा असेल तर तुम्ही रामतीर्थ धबधब्याला भेट देऊ शकता. या परिसरात अशी अनेक मंदिरे आहेत जिथे यात्रेकरूंची नेहमीच गर्दी असते.सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य हे कोल्हापूर जिल्ह्यातील एक अद्वितीय संरक्षित क्षेत्र आहे जे मानवनिर्मित जंगल आहे. सुमारे ११ चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या अभयारण्यमध्ये कृत्रिमरीत्या ॲम्फीथिएटरमध्ये वन्यजीवांची ओळख करून देण्यात आली आहे. अभयारण्यामध्ये समृद्ध वनस्पती आणि प्राणी आहेत ज्यामुळे ते कोल्हापुरात भेट देण्याच्या सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक बनते आणि दरवर्षी हजारो पर्यटक येतात.

संकलन संयोजन



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय

रविवार, १९ एप्रिल २०२६



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे




ठाकरे शिवसेनेचे नवनिर्वाचित तालुकाप्रमुख सुभाष जाधव यांचा वहाळ जिल्हा परिषद गटातर्फे सत्कार करताना सुनील जाधव, पुंडलिक पवार, रघुनाथ सावंत, दादा घाग, श्री.गावकर, रमेश रेपाळ आणि मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत (छाया : ओंकार रेळेकर)

## अखेर शिवप्रेमींच्या स्वप्नपूर्तीचा क्षण... हसळा नगरपंचायतीचा ऐतिहासिक शिवनिर्णय! म्हसळ्यात शिवपर्व सुरू!

द. रा. जि. उपसंपादक : संतोष उध्दरकर

म्हसळा:म्हसळा शहरातील तमाम शिवप्रेमींचे अनेक वर्षांचे स्वप्न अखेर साकार झाले आहे. शहरातील मुख्य केंद्रबिंदू असलेल्या दिघी नाका याचे नामकरण आता छत्रपती शिवाजी महाराज चौक असे करण्याचा ऐतिहासिक ठराव आज म्हसळा नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण असून ''शिवपर्वा''ला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे.

पाठपुराव्याला यश: शिवप्रेमींच्या मागणीची दखल

हिंदू ग्रामस्थ मंडळ म्हसळा, गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान आणि तत्कालीन अखंड शिवसेना यांसारख्या विविध शिवप्रेमी संघटनांनी दिघी नाक्याचे नामकरण करण्याची आग्रही मागणी केली होती. या संदर्भात तत्कालीन नगराध्यक्ष तथा विद्यमान गटनेते संजय प्रभाकर कर्णिक यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता.




कर्णिक यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्याशी शिवप्रेमींची भेट घडवून आणली होती. त्यावेळी खासदार तटकरे यांनी ''हे काम होणारच'' असे दिलेले वचन आज पूर्ण झाले आहे.

नगरपंचायतीच्या सभेत ऐतिहासिक मोहोर :

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ रोजी प्रभारी नगराध्यक्ष अनिकेत पानसरे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत नामकरणाचा ठराव मांडण्यात आला आणि तो बहुमताने मंजूर करण्यात आला.

ठरावाच्या बाजूने उभे राहिलेले लोकप्रतिनिधी:

या ऐतिहासिक निर्णयासाठी नगरसेविका राखी करंबे, जयश्री कापरे, सरोज म्हशीलकर, संजय दिवेकर आणि सुनील शेडगे यांनी सक्रिय पाठिंबा दर्शवला.

-------------------------------------

''आजचा दिवस म्हसळा शहराच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिला जाईल. दिघी नाका हे नाव पुसून आता त्या ठिकाणी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव झळकणार आहे, याचा आम्हा सर्व शिवप्रेमींना सार्थ अभिमान आहे.''

नंदकुमार वसंत गोविलकर, अध्यक्ष, हिंदू ग्रामस्थ मंडळ, म्हसळा

-----------------------------------

१५ फेब्रुवारी २०२२ रोजी दिघी नाका याचे छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामांतरण करावे या आशयाचे म्हसळा नगरपंचायत म्हसळा इथे सर्वप्रथम पत्रक देऊन शिवसेना (उ बा ठा ) युवासेना म्हसळा संघटनेकडुन मागणी करण्यात आली होती आणि या पत्रकाची दखल घेण्यात आली आहे. आज पासुन दिघी नाका याचे नामांतरण होऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात आले आहे.. सर्व शिवप्रेमींचा विजय आहे.

कौस्तुभ करडे.
युवा तालुका अधिकारी.
युवासेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

---------------------------------------

प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच या चौकाचा नामकरण सोहळा भव्य स्वरूपात साजरा केला जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

आजपासून नवी ओळख: ''छत्रपती शिवाजी महाराज चौक, म्हसळा!''

## खोपोली शिळफाटा येथे ट्रान्सपोर्ट पार्किंगला कुणाचा आशीर्वाद?

खोपोली : शहरातील शिळफाटा परिसरात अनधिकृत ट्रान्सपोर्ट पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्य रस्ते तसेच आतील मार्गांवर मोठ्या प्रमाणात ट्रक, ट्रेलर आणि कंटेनर उभे राहत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. ''हे पार्किंग सुरू ठेवण्यासाठी नेमकं कुणाचा आशीर्वाद आहे?'' असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.ङ्गशिळफाटा हा मुंबईपुणे मार्गाशी जोडलेला महत्त्वाचा दुवा असल्याने येथे दिवसभर जड वाहनांची वर्दळ असते. मात्र काही ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांनी सार्वजनिक रस्त्यांचा वापरच पार्किंगसाठी सुरू केल्याने परिस्थिती अधिकच बिघडली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनांची संख्या वाढल्याने रस्ते अरुंद होतात आणि अपघाताचा धोका वाढतो. आपत्कालीन सेवांनाही यामुळे अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.ङ्गस्थानिक दुकानदारांच्या




मते, ट्रकच्या रांगांमुळे ग्राहकांना ये-जा करणे कठीण होत असून व्यवसायावर परिणाम होत आहे. रहिवाशांनी ध्वनीप्रदूषण, धूर आणि सुरक्षिततेच्या मुद्द्यांवरही नाराजी व्यक्त केली आहे. शाळा व निवासी भागाजवळही ही जड वाहने उभी राहत असल्याने पालकांमध्ये चिंता वाढली आहे.ङ्गया प्रकाराबाबत नगरपरिषद आणि वाहतूक विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. काही वेळा कारवाई झाली तरी ती तात्पुरती ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या संपूर्ण प्रकारामागे कुणाचा तरी मूक पाठिंबा असल्याची चर्चा रंगू लागली आहे.ङ्गदरम्यान, ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, अधिकृत पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने त्यांना रस्त्यावर वाहनं उभी करावी लागतात. प्रशासनाने नियोजित ट्रक पार्किंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी त्यांची मागणी आहे.ङ्गएकूणच, शिळफाटा येथील ट्रान्सपोर्ट पार्किंगचा प्रश्न हा केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून तो नागरिकांच्या सुरक्षेशी निगडित आहे. प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलून अनधिकृत पार्किंग हटवावे व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )